PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Soona Yeti Gharat
Year: 1995

Song: Haat sodna tujhich mee
Lyricist:

हात सोडना तुझीच मी
तुला सांगू कसं
अरे हात सोडना तुझीच मी
तुला सांगू कसं
भरदिवसाची वेळ केव्हा टळे
तुला भरलं पिसं
लाज ओलेती गालावरी
मन पाखरू धडके ऊरी हो...
दूर उभी का आतूर मी
तुला सांगू कसं
का छळसी मला
प्रिती तुला सारं सांगू कसं
जादू ओलेत्या रूपातली
कधी नाही अशी पाहिली हो...
हात सोडना तुझीच मी
तुला सांगू कसं

टकमक रोखूनिया पाहू नको रे
अशी ठिणगी जागे मनी
टकमक रोखूनिया पाहू नको रे
अशी ठिणगी जागे मनी
असूनिया जवळी
दूर दूर होतीस तू
स्वप्नातली मोहिनी
दिवस नव्या बहराचे
हृदयी झुलतो बघ झुला
धुंदी नवी अधरांची
स्पर्शही नवखा भासला
हे आभाळ माझे तुझे
झेप घेऊया पंखावरी हो...
दूर उभी का आतूर मी
तुला सांगू कसं
हो हात सोडना तुझीच मी
तूला सांगू कसं

भरतीच्या लाटेपरी जग झुल झुलते
केली गं किमया कुणी
प्रणयाची भाषा जरा समजून घे रे
आतूर डोळ्यातली
सहवासी आज तुझ्या
पहा उधळल्या दश दिशा
साथ जुळे जन्मांची
सूर मनात जागला
हात हाती तुझा घेऊनी
स्वर्ग उतरून आला घरी हो...
हात सोडना तुझीच मी
तुला सांगू कसं
अगं दूर उभी का आतूर मी
तुला सांगू कसं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*